
दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
बीड/महाराष्ट्र ● गुरुवार १८ जूले २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष १ ले ● अंक ३३६ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये




गाव तेथे वार्ताहर
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.
वादळ वार्ता या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
दैनिक वादळ वार्ता
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.
* पात्रता *
समाजसेवेची आवड, जनसंपर्क, फोन असणे आवश्यक ,सोशल मीडियाचा वापर करता येणे
दैनिक वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव विभागीय निर्भिड दैनिक
मो.न.9422660077

# मुख्यमंत्र्यांनी लाडका भाऊ योजना पंढरपुरातून केली जाहीर !

**'वादळवार्ता/पंढरपुर**

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण' योजनेनंतर आता लाडक्या भावांसाठी देखील एक योजना आणली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंढरपूरमध्ये एक महत्वपूर्ण घोषणा केली आहे. मुख्यंमंत्र्यांनी 'लाडका भाऊ' योजना जाहीर केली . या योजनेअंतर्गत १२ वी पास झालेल्या तरूणांना दरमहा ६ हजार रुपये, डिप्लोमा केलेल्या विद्यार्थ्यांना ८ हजार रुपये आणि पदवीधर विद्यार्थ्यांना १० हजार स्टायपेंड देण्याची घोषणा करण्यात आली आहे. या योजनेद्वारे बेरोजगारीवर उपाय शोधून काढणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले आहे. अर्थसंकल्पात महिलांसाठी 'लाडकी बहीण' ही योजना जाहीर करण्यात आली होती. त्याअंतर्गत २१ ते ६० वयोगटातील पात्र महिलांना शासनातर्फे दरमहा १५०० रुपये दिले जाणार आहेत. बहिणींसाठी योजना, मग लाडक्या भावांसाठी काय, असा प्रश्न विरोधकांनी त्यावर उपस्थित केला होता. मात्र आता राज्य सरकारने लाडक्या भावांसाठीदेखील योजना आणली आहे.



## लाडका भाऊ योजना महाराष्ट्र 2024 चे फायदे आणि वैशिष्ट्ये

लाडका भाऊ योजना महाराष्ट्राच्या माध्यमातून राज्यातील बेरोजगार युवक व विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षणाचा लाभ देऊन त्यांना रोजगारासाठी तयार केले जाणार.,या योजनेंतर्गत प्रशिक्षणासोबतच बेरोजगार तरुणांना दरमहा १० हजार रुपयांच्या आर्थिक मदतीचा लाभही दिला जाणार आहे . ,प्रशिक्षणादरम्यान, राज्य सरकार १२ वी उत्तीर्ण तरुणांना दरमहा ६,००० रुपये, आयटीआयला ८,००० रुपये आणि पदवीधरांना १०,००० रुपये देणार आहे.,ही योजना राज्यातील तरुणांचे तांत्रिक आणि व्यावहारिक कार्य कौशल्य वाढविण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे.तुम्ही लाडका भाऊ योजना महाराष्ट्रासाठी अर्ज केल्यास सरकार तुम्हाला ६ महिन्यांच्या प्रशिक्षणाचा लाभ देईल.

## लाडका भाऊ योजनेचा फायदा कुणाला मिळणार ?

जो तरुण १२ वी उत्तीर्ण झाला असेल, त्याला दरमहा सहा हजार रुपये दिले जातील. तर डिप्लोमा केलेल्या तरुणाला आठ हजार रुपये मिळतील. तसेच पदवीधर तरुणाला १० हजार रुपये महिन्याला दिले जातील. यासाठी अर्जदाराचे वय १८ ते ३५ वर्षांच्या दरम्यान असणे गरजेचे आहे. तसेच अर्जदाराचे बँक खाते हे आधार कार्डशी जोडलेले असले पाहिजे.

## लाडका भाऊ योजना साठी पात्रता काय ?

१) भाऊ योजना महाराष्ट्र २०२४ चा लाभ घेण्यासाठी, राज्य सरकारने विहित केलेली पात्रता पूर्ण करणे आवश्यक आहे.
२) या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार हा मूळचा महाराष्ट्र राज्यातील असणे आवश्यक आहे.
३) या योजनेसाठी फक्त महाराष्ट्र राज्यातील तरुण किंवा विद्यार्थी पात्र असतील.
४) अर्जदाराचे वय १८ ते ३५ वर्षांच्या दरम्यान असावे.
५) शैक्षणिक पात्रता किमान १२वी पास, डिप्लोमा, पदवीधर इतकी असावी.
६) या योजनेसाठी राज्यातील बेरोजगार तरुणच पात्र असतील.
७) अर्जदाराचे बँक खाते आधार कार्डशी जोडलेले असावे.

## आरक्षणाच्या प्रश्नावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न..



मुंबई/प्रतिनिधी या बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री चंद्रकांत पाटील, राधाकृष्ण विखे पाटील, छगन भुजबळ, रवींद्र चव्हाण, धनंजय मुंडे, शंभूराजे देसाई, अतुल सावे, दादा भुसे, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, तसेच विविध पक्षांचे नेते सर्वश्री प्रकाश आंबेडकर, खा. अशोक चव्हाण, खा. सुनील तटकरे, प्रवीण दरेकर, प्रकाश शेंडगे, जोगेंद्र कवाडे, बच्चू कडू, भरत गोगावले, कपिल पाटील, महादेव जानकर, सदाभाऊ खोत, गोपीचंद पडळकर, सचिन खरात, मंगेश ससाणे, रत्नाकर गुट्टे, सुरेश धस, राजू पाटील, प्रशांत इंगळे, समित कदम उपस्थित होते.

## रांजणी जिल्हा परिषद उर्दू शालेय व्यवस्थापन समितीची बिनविरोध निवड

**जालना/असलम कुरेशी**

घनसावंगी तालुक्यातील रांजणी येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेची शालेय व्यवस्थापन समितीची सोमवारी बिनविरोध निवड करण्यात आली. रांजणी येथील जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळेची शालेय व्यवस्थापन समितीची निवड करण्यासाठी सोमवारी पालकांची बैठक आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी शालेय व्यवस्थापन समितीची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष पदी नुज़हत इरफान शेख, उपाध्यक्ष इलियास शाहबोद्दीन कुरेशी, सदस्य अंजुम इम्रान कुरेशी, इब्राहिम इस्माईल शेख, शाहीन फिरोज़ खान, फारुख बागवान, सय्यद सलमा इम्रान अली, अतहरोद्दीन कमरोद्दीन काज़ी, अखिल खलील शाह, शोएब इर्शाद काज़ी, सचिव इलियास पठाण (मुख्याध्यापक) आदींची बिनविरोध निवड करण्यात आली.



## नवीन शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासाला चालना मिळेल-प्राचार्य डॉ.शिंदे

**नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट**

नांदेड : नवीन शैक्षणिक धोरण हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अतिशय योग्य असून या धोरणाचा लाभ नक्कीच विद्यार्थ्यांना भविष्यात होईल, असे मत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी प्र- कुलगुरू तथा यशवंत महाविद्यालयाचे विद्यमान प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन.शिंदे यांनी व्यक्त केले. यशवंत महाविद्यालयात दि. १६ जुलै रोजी 'नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून स्वा. रा.ती.म. विद्यापीठातील विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचे प्र.अधिष्ठाता डॉ. एम.के.पाटील यांची उपस्थिती होती, तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन.शिंदे होते. कार्यशाळेला रसायनशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ.डी.आर.मुंढे, रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ.एम.ए. बशीर, अधीसभा सदस्य डॉ.अविनाश शिंदे, डॉ.वाय.एस.नलवार, डॉ.जमन अंगुलवार, डॉ.अभय बोंडगे, डॉ.नितीश कामीनवार, डॉ.शिवराज सिरसाट, डॉ. बी.एस.खाडे, डॉ.अनिल चिद्रावार, डॉ. सुरेश ढगे, डॉ.अनिलकुमार जाधव आदींची उपस्थिती होती. याप्रसंगी डॉ.एम.के.पाटील यांनी, नवीन शैक्षणिक धोरणावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. पुढे बोलताना प्राचार्य डॉ. शिंदे म्हणाले की, नवीन शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासाला चालना मिळेल; तसेच विद्यार्थ्यांना भविष्यात करिअर घडविण्याच्या दृष्टीने नवीन शैक्षणिक धोरण अत्यंत उपयुक्त आहे, असे त्यांनी सांगितले. कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी स्वा. रा.ती.म.विद्यापीठाच्या रसायनशास्त्र संकुलाच्या संचालिका डॉ.संगिता




माकोने यांनी, नवीन शैक्षणिक धोरणानुसार रसायनशास्त्र अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरणार असल्याचे प्रतिपादित केले. चर्चासत्रात नवीन शैक्षणिक धोरण:२०२० नुसार बी.एस्सी. प्रथम वर्षाचा रसायनशास्त्राचा अभ्यासक्रम, कौशल्य वृद्धिंगत अभ्यासक्रम, जेनेरिक इलेक्टिव्ह याची व्याप्ती, मर्यादा, दृष्टिकोन, अध्यापन आणि अध्ययनाचे निष्कर्ष, अनुभवजन्य अध्ययन पद्धती यावर संसाधकांनी सविस्तर चर्चा केली. कार्यक्रमात माजी विभागप्रमुख डॉ. महेश कळंबकर व महाविद्यालयातील रसायनशास्त्र प्रयोगशाळा सहायक श्री.जेठेवाड नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यानिमित्त त्यांचा सत्कार करुन त्यांना निरोप देण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. विजय भोसले यांनी केले तर उद्घाटन सोहळ्याचे आभार डॉ.संभाजी वर्ताळे आणि समारोप सोहळ्याचे आभार डॉ. एस.व्ही.खानसोळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्य डॉ.कविता सोनकांबळे तथा डॉ. हरिश्चंद्र पतंगे, डॉ.एस.पी.वर्ताळे, डॉ.एस.बी.जुन्ने, डॉ.एस.व्ही. खानसोळे, डॉ.के.एल.केंद्रे, डॉ.एम. डी.अंभोरे, डॉ.ए.एस.कुवर, डॉ.निलेश चव्हाण, डॉ.डी.एस.कवळे, प्रा.संतोष राऊत, स्नेहल पाटील, प्रा.शांतुलाल मावसकर, कार्यालयीन प्रबंधक संदीप पाटील, अधीक्षक कालिदास बिरादार व गजानन पाटील, प्रसिद्धी समन्वयक डॉ.अजय गव्हाणे आर्दीनी सहकार्य केले.

## यंग स्टार क्रिकेट लीग मध्ये निवड झालेल्या मुलांचा विश्वनाथ हुले साहेब यांच्या हस्ते सत्कार



पाटोदा प्रतिनिधी :- ओशन क्रिकेट अकॅडमीच्या मुलांनी वाय एस सी एल मध्ये निवड झाल्याबद्दल व राज्यस्तरीय पंच परीक्षा पास झाल्याबद्दल विद्यार्थ्यांचा सत्कार विश्वनाथ हुले यांच्या हस्ते संपन्न झाला. पाटोदा सारख्या ग्रामीण भागातून नवनवीन खेळाडू वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये चमकावेत. वाय एस सी एल स्पर्धेमध्ये पाटोदा येथील मुले चमकावेत. त्यांना सर्व तो परी सहकार्य करू असे विचार यावेळी विश्वनाथ हुले पाटील यांनी आपल्या छोटेखानी भाषणात व्यक्त केले. हुले कंट्रक्शन ऑफिस येथे पार पडला. यावेळी यशस्वी विद्यार्थी पृथ्वी भोंडवे अंश कांक्रीया आदित्य जायभाय संकेत बांगर देवांश बांगर स्वराज छोले दूध वडे हे पालकांसह उपस्थित होते.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची नोंदणी ३१ ऑगस्टपर्यंत केली तरीही लाभ जुलैपासून मिळणार-पालकमंत्री अतुल सावे

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जिल्हास्तरीय समितीची बैठक संपन्न

जालना/असलम कुरेशी

राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी महाराष्ट्रात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु करण्यात आलेली आहे. तरी जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शेवटच्या पात्र महिला लाभार्थ्यांपर्यंत योजनेचा लाभ पोहचविण्यासाठी नोंदणीवर भर देण्यात यावा. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची नोंदणी ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत केली तरीही लाभ १ जुलैपासून देण्यात येईल, अशी नि:संदिग्ध ग्वाही राज्याचे गृहनिर्माण, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे मंत्री तथा जालना जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी बैठकीत दिली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना जिल्हास्तरीय समितीची बैठक व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे घेण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना, निवासी उपजिल्हाधिकारी सोहम वायाळ यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते. पालकमंत्री श्री. सावे म्हणाले की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी नारी शक्ती दूत ॲपवर अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. तरी या ॲपवर उदभवणाऱ्या तांत्रिक समस्या तातडीने सोडविण्यासाठी जबाबदार तंत्रस्नेहीची नेमणूक करण्यात यावी. नगरपंचायत, नगरपालिका, महापालिका, महिला व बाल कल्याण विभागासह अंगणवाडी सेविकांचे सहाय्य घेवून त्यांना प्रती दिन उद्दीष्ट देवून ग्रामीण भागातील शेवटच्या पात्र महिलेची नोंदणी करण्यात यावी. पात्र महिलांच्या नोंदणीचे काम शासकीय यंत्रणेकडून १०० टक्के होण्यासाठी वेळोवेळी आढावा घेवून दक्षता घ्यावी. तसेच वेळोवेळी लोकप्रतिनिधींचे सहकार्यही घेण्यात यावे. ज्या अंगणवाडी सेविका मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे आपल्या उद्दीष्टपूर्तीसह उत्कृष्ट काम करतील त्यांचा



सन्मान येत्या प्रजासत्ताक दिनी करण्यात येईल. असेही त्यांनी सांगितले. तसेच पाऊस, पिक विमा, खते, बि-बियाणे या कृषी निविष्ठांची परिस्थिती जाणून घेतली. सुरुवातीस जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ यांनी नारी शक्ती दूत ॲपवरील बाबी अधिक सुस्पष्ट करण्यात आलेल्या असून लाभार्थ्यांची अडचण होवू नये यासाठी दक्षता घेण्यात येत आहे. जालना जिल्ह्यात आज रोजीपर्यंत जवळपास ७०२५९ अर्ज जमा झाले आहेत तसेच ऑनलाईन २४११२ अर्ज आले असल्याचे सांगून जिल्हास्तरीय समितीच्या कार्यकक्षा, विविध विभागांना नेमून दिलेली कामे, बैठका, प्रशिक्षण, अर्जाची स्थिती, केंद्र, शिबीरे आदिची माहिती संगणकीय सादरीकरणाद्वारे उपलब्ध करुन दिली.

## बीड बसस्थानकात फराळाचे वाटप



प्रतिनिधी | बीड

बीड शहरातील बसस्थानकात बुधवारी आषाढी एकादशीच्या निमित्ताने सकाळी ९ ते ११ या वेळेत फराळाचे वाटप करण्यात आले. बीड बसस्थानक परिसरातील व्यापारी, ट्रॅव्हल्स चालक मालक, ॲटो रिक्षा युनीयन यांच्या वतीने बुधवारी वारकरी व नागरिकांना फराळाचे वाटप करण्यात आले. यावेळी एक क्विंटल शाबुदाना खिचडी आणि केळीचे वाटप करण्यात आले. यावेळी ईश्वर गुरखदे, मिलींद वाव्हळ, पत्रकार अनिल घोरड, शिवाजी ढगे, इतर कार्यकर्ते उपस्थीत होते.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज मराठा सांस्कृतिक भवनचे भूमिपूजन

## तीर्थ क्षेत्र पंढरपूरच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

### राजर्षी छत्रपती शाहू महाराज मराठा सांस्कृतिक भवनासाठी आवश्यक तेवढा निधी उपलब्ध करण्यात येईल

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर, दि. १७ : आषाढी एकादशी निमित्त राज्यातील लाखो भाविक विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपुरात दाखल झाले असून पंढरपूर नगरी भक्ती रसात नाहून निघाली आहे. वारकऱ्यांना सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आणि पंढरपूर तीर्थ क्षेत्र सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध आहे, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. पंढरपुरातील भक्ती मार्गावर बांधण्यात येणाऱ्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज सांस्कृतिक भवनच्या भूमिपूजन प्रसंगी मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. यावेळी सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रा. तानाजी सावंत, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार भरत गोगावले, समाधान आवताडे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पंढरपूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. प्रशांत



जाधव, उपमुख्याधिकारी सुनील वाळुंजकर आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना, एक रुपयात शेतकऱ्यांसाठी पीक विमा योजना, साडे सात हॉर्स पॉवर पंपासाठी मोफत वीज, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेअंतर्गत ३ सिलेंडर मोफत, मुलींना मोफत शिक्षण, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत कर्ज योजना, बेरोजगार तरुणांना १२ वी नंतर ६ हजार, डिप्लोमा नंतर ८ हजार व पदवीधर साठी १० हजार प्रशिक्षण भत्ता इत्यादी योजना राबविल्या जात आहेत. राज्यातील शेतकऱ्यांना विमा कंपनीने आतापर्यंत ७ हजार २०० कोटी रुपये अदा केले आहेत. वयोश्री योजनेअंतर्गत वृद्ध व्यक्तीसाठी ३ हजार रुपये देण्यात येत आहेत. एकूणच शासन शेतकरी, कामगार, कष्टकरी, वारकरी अशा सर्वसामान्य जनतेच्या पाठीशी उभे असून त्यांच्यासाठी शासन अनेक महत्वपूर्ण योजना राबवित आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज मराठा सांस्कृतिक भवनासाठी शासनाने ५ कोटी रुपये मंजूर केले आहेत. त्यासाठी आणखीन १० कोटी रुपये मंजूर करण्यात येतील. निधीची कमतरता भासू देणार नाही. विकास आणि कल्याणकारी योजनांची सांगड घालून शासन सर्व घटकांसाठी काम करत आहे. आषाढी वारी नंतर पंढरपूर शहर स्वच्छ, निर्मळ आणि सुंदर ठेवावे, अशा सूचना देवून वारकऱ्यांनी परतीचा प्रवास सुरक्षित करावा, गडबड करू नये, असे निर्देश मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले.

# गजापुर ( विशाळगड ) प्रकरणी विरोधी पक्षाच्या नेत्यांची प्रतिक्रिया न येणे या पेक्षा दुर्दैव काय..?

## कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी राजीनामा द्यावा-पत्रकार परवेज पटेल

**अंबाजोगाई/परवेज पटेल**


गत लोकसभा निवडणुकीत मुस्लिम समाजाने एकत्र येत महाविकास आघाडीच्या नेत्यांना साथ दिली, लोकसभा निवडणुकीत सत्ताधारी पक्षाला सोडून विरोधी पक्ष असलेल्या तिन्ही पक्षाच्या उमेदवारांना भरभरून मतदान दिले. लोकसभेत पाठवण्यासाठी मोठे पाठबळ दिले, परंतु याला काही दिवस उलटत नाही तोपर्यंत मुस्लिम समाजाच्या अस्मितेचा आणि भावनांचा संबंध ज्या धार्मिक स्थळाशी असतो त्या धार्मिक स्थळावर काही द्वेशी वृत्तीचे लोक अचानक पने हल्ला चढवतात हातात तलवारी काठ्या घेवून मुस्लिमांच्या धर्म स्थळांची आणि संपत्तीची तोड फोड करून त्यांच्या संपत्तीची लूट करतात, त्यांना मानसिक, आर्थिक नुकसान पोहोचवतात, याला तीन ते चार दिवस उलटून गेली तरी यावर सत्ता पक्ष तर सोडा सक्षम विरोधी पक्ष असलेला माहविकास आघाडी च्या एक ही नेत्याची प्रतिक्रिया वेत नाही तुमच्या अडचणीच्या काळात तुम्हाला भरभरून साथ दिली. अनेकांना अंगावर घेतले त्यांच्या साठी तुम्हाला साधी संवेदनशीलता ही व्यक्त करता येत नाही हे मोठे दुर्दैव, म्हणजे याला आम्ही काय समजायचे फक्त निवडणुका पुरता समाजाच्या मतांचा वापर करून घ्यायचा आणि अश्या अडचणीच्या प्रसंगात समाजाला वाऱ्यावर सोडून द्यायचे. हे कोणते पुरोगामी धोरण विशाळगडाच्या अतिक्रमणाचा विषय हा न्यायालयांनी प्रक्रियेचा भाग आहे त्या साठी कायदा आहे शासन आहे कायद्यानुसार त्यावर निर्णय होईल, अश्या प्रकारे धुडगूस घालून तलवारी, हातात घेवून उद्रेक पसरवण्याचा प्रकार पुरोगामी महाराष्ट्रात होतो आणि स्वतःला



पुरोगामी म्हणून घेणारे व गंभीर प्रकरणावर साधी प्रतिक्रिया सुद्धा देत नाहीत ही शोकांतिका फक्त निवडणुका आल्या की मुस्लिम समाजाच्या डोक्यावरून हात फिरवायचा आणि अश्या प्रसंगात साधी धीर देण्या इतपत प्रतिक्रिया ही द्यायची नाही यातून असे कळते की तुम्हाला आमच्या धार्मिक आणि सामाजिक समस्यांचे काहीच देणे घेणे नाही आम्हाला ही यातून असेच बोध मिळते या पुढे आम्हाला ही आता वेगळा विचार करावा लागेल याची दखल घ्यावी व विशाळगड प्रकरणातील आरोपींना कठोर शिक्षा शासनाने करावी त्या ठिकाणी झालेल्या नुकसानीची नुकसान भरपाई देण्यात यावी, कोल्हापूर जिल्ह्याचे पालक मंत्री असलेले हसन मुश्रीफ यांनी नैतिकतेच्या आधारावर आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, जो कोणी मास्टर माईंड या सर्व प्रकरणाच्या मागे असेल त्याला पण कायद्याने शिक्षा द्यावी व या पुढे महाराष्ट्रात अश्या घटना होऊ नये या साठी मुस्लिम संरक्षण कायदा अमलात आणावा अशी मागणी तालुका प्रतिनिधी पत्रकार परवेज पटेल यांनी केली आहे

# जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण ; आठ जणाविरुद्ध ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल !

**केज/प्रतिनिधी**
दारू पिऊन जातीवाचक शिवीगाळ करून कुटुंबातील लोकांना काठी आणि दगडाने मारहाण केल्या प्रकरणी आठ जणांच्या विरुद्ध ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि.१५ जुलै रोजी केज तालुक्यातील कळंबअंबा येथील गणेश शिवाजी मस्के व त्यांचे चुलते उत्तम मस्के हे त्यांच्या घरा समोर बसलेले असताना त्यांच्या शेतात शेजारी शेत असलेला बंकटी हरीभाऊ तारुकर हा दारु पिऊन त्यांच्याकडे आला. त्याने विनाकारण दोघांना जातीवाचक शिविगाळ करु लागला. भांडणाचा आवाज ऐकुन गणेश मस्के याचे वडिल शिवाजी मस्के, आई मैनाबाई मस्के व पत्नी रंजना मस्के, चुलती कांचना मस्के, चुलती लक्ष्मी मस्के असे घराचे बाहेर आले. त्यानी बंकटी तारुकर यास आमचे लोकांना शिविगाळ का करता. असे म्हणताच बंकटी तारुकर याने गणेश मस्के यांचे चुलते उत्तम रंगनाथ मस्के यांना डोक्यात दगड मारुन दुखापत केली. नंतर बंकटी तारुकर यांने फोन करुन त्याचे वडिल हरीभाऊ काकासाहेब तारूकर व नातेवाईकांना फोन करुन बोलावुन घेतले. त्या पैकी हरीभाऊ काकासाहेब तारुकर याने गणेश मस्के यांचे वडिल शिवाजी रंगनाथ मस्के यांच्या पाठीमध्ये काठीने मारहाण करुन मुक्कामार दिला. तर त्यांच्या सोबतच्या नातेवाईकांनी काठी आणि दगडाने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. गणेश मस्के यांच्या तक्रारी वरून बंकटी



हरिभाऊ तारुकर, हरीभाऊ काकासाहेब तारुकर, गणेश रामभाऊ तारुकर, रंधावणी रामभाऊ तारुकर, शालुबाई, सिताबाई हरिभाऊ तारुकर, दिपा बंकटी तारुकर आणि रामभाऊ दगडुबा तारुकर सर्व (रा. कळंबअंबा ता. केज ) या आठ जनांच्या विरुद्ध युसूफवडगाव पोलीस ठाण्यात १६८/२०२४ ॲट्रॉसिटी कलम ३(१) (आर), ३(१) (एस), ३(२) (व्हीए) यासह भा.न्या. सं. ११५(२), ११८(१), १८९(२), १९०, २९१(२) ९११(३), ३५१(३) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणी सहाय्यक पोलिस अधीक्षक कमलेश मीना हे तपास करीत आहेत.

# सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफी करावी-बदामराव पंडित

**गेवराई/प्रतिनिधी**
राज्य सरकारने लाडकी बहीण योजना आणून महिलांना आर्थिक सहाय्य करण्याच्या उद्देशाने निर्णय घेतला आहे त्याचप्रमाणे दुष्काळाच्या झळा सहन केलेल्या आणि वेगवेगळ्या बँकेचे कर्ज घेऊन कर्जबाजारी झालेल्या शेतकरी बांधवांनाही कर्जमाफी करून त्यांच्या संसाराला हातभार लावावा अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी केले आहे.

राज्य सरकारने महिलांना घर खर्चासाठी किंवा मुला मुलींचा सांभाळ करण्यासाठी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू करून दीड हजार रुपये महिना देण्याचे जाहीर केले आहे. ही योजना महिलांसाठी चांगली आहे. परंतु बीड जिल्ह्यातील शेतकरी गेल्या तीन वर्षापासून दुष्काळाला सामोरे जात आहे. हाती आलेले पीकही त्याला मिळाले नसल्याने त्याचे अतोनात नुकसान झालेले आहे. त्यातच अनेक बँकांचे कर्ज असल्याने



तेही शेतकरी बांधव फेडू शकत नाहीत. अनेक शेतकऱ्यांनी आपले पशुधनही विकली आहे. आर्थिक परिस्थिती नाजूक, पिकाचे झालेले नुकसान आणि बँकेचे असलेले कर्ज यामुळे घर गाडा चालवणेही त्यांना अवघड झाले आहे. शेतकरी बांधवांना आपल्या मुलींचे लग्न कार्य करणे ही कठीण झाले आहे. त्यामुळे राज्य सरकारने शेतकरी बांधवांच्या या आर्थिक परिस्थितीची गांभीर्याने दखल घ्यावी आणि मोठ्या आर्थिक विवंचनेत असलेल्या शेतकऱ्यांचे सरसकट कर्जमाफी करून त्यांना आर्थिक हातभार लावावा अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी राज्य सरकारकडे केली आहे.

# बर्दापूरच्या वेअर हाऊस मालकास अपर सत्र न्यायालयाचा दणका; फेरविचार याचिका फेटाळली

**अंबाजोगाई/परवेज पटेल**
अंबाजोगाई तालुक्यातील बर्दापूर येथील श्रीराम वेअर हाऊस येथून शेतकऱ्यांचा शेतमाल चोरीला गेल्याची घटना घडली होती. यानंतर विम्यापोटी आलेली लाखो रुपयांची रक्कम वेअर हाऊस मालकाने शेतकऱ्यांना न देता परस्पर हडप केल्याची फसवणुकीची तक्रार करत शेतकऱ्यांनी न्यायालयात धाव घेतली होती. या प्रकरणात वेअर हाऊस चालकाने दाखल केलेली फेरविचार याचिका फेटाळून लावत न्यायालयाने वेअर हाऊस चालकास दणका दिला आहे याबाबत अधिक माहिती अशी की श्रीराम वेअर हाऊस येथून माल चोरीला गेल्यानंतर विमा कंपनीकडून लाखो रुपयांचा विमा मंजूर झाला विम्यापोटी आलेले लाखो रुपये शेतकऱ्यांना न देता श्रीरंग द्वारकादास बजाज, श्यामसुंदर श्रीरंग बजाज, पुरुषोत्तम श्रीरंग बजाज आणि नितीन श्रीरंग बजाज यांनी परस्पर हडप करून शेतकऱ्यांची



फसवणूक केली अशी तक्रार करून शेतकऱ्यांनी कलम 420, 406 व 34 नुसार हे प्रकरण न्यायालयात लावून धरले. या प्रकरणी आरोपींनी अपर जिल्हा न्यायालयात फेरविचार याचिका दाखल केली होती. मागील सहा वर्षापासून शेतकरी न्यायासाठी लढा देत होते न्यायालयाने सदरील याचिका फेटाळून लावत शेतकऱ्यांच्या बाजूने निकाल दिला आहे. या निकालावर हा सत्याचा व लोकशाहीचा विजय आहे अशी भावना शेतकरी ज्ञानेश्वर आबासाहेब देशमुख जवळगाव यांनी बोलून दाखवली असून न्यायालयाचे आभार मानले आहेत या निकालाविरोधात बजाज यांनी तत्काळ उच्च न्यायालयात धाव घेतली आहे मात्र शेतकऱ्यांनी देखील कायदेशीर मार्गाने उच्च न्यायालयात लढण्याची तयारी केली असून वेळप्रसंगी सर्वोच्च न्यायालयात देखील लढा देण्याचा निर्धार केला आहे. हे प्रकरण न्यायालयात प्रभावीपणे मांडणारे ॲड. माधव जाधव यांचे देखील शेतकऱ्यांनी आभार मानले आहेत

# धारुर ग्रामीण रुग्णालयाच्या रस्त्याची दुरावस्था ;आंदोलनाचा इशारा

**किल्लेधारुर/प्रतिनिधी**
धारूर येथील ग्रामीण रुग्णालयाकडे जाणा-या रस्त्याची प्रचंड दुरावस्था झाली असून या रस्त्याने गाडी चालवणे सोडा पायी जाणे येणे मुश्कील झाल्याने रुग्णांना व रुग्णांचे नातेवाईकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे त्यामुळे तात्काळ हा पुर्ण रस्ता सिंमेट रस्ता करावा आशी मागणी या भागातील युवक सामाजीक कार्यकर्त कैलास बोरगावकर व नागरीकानी केली आहे . धारूर ग्रामीण रुग्णालय हे धारूर ग्रामिण मध्ये असून ग्रामीण रुग्णालयाकडे जाणारी येणारी नागरीकांची संख्या मोठी आहे, रुग्णवाहीणी व गंभिर रुग्णाला याच रस्त्याने ने आण करावी लागते संभाजीनगर धारूर ग्रामीण मधील श्री हनूमान मंदीर ते ग्रामीण रुग्णालय या रस्त्याची प्रचंड दुरावस्था झाली असून या रस्त्यावर सर्वत्र खड्डेचे साम्राज्य झाले असून पावसाळ्यात साचणारे पाण्या मुळे दुचाकी चारचाकी वाहण चालवणे मुश्कील होते. पायी चालताना पादचारी रुग्नाला व सोबतचे नातेवाईकाला चालणे मुश्किल होते खड्डा चुकवताना पाणी कधी अंगावर येईल उडेल हे सांगणे मुश्कील रुग्णांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते वारंवार मागणी करून ही या रस्ता दुरूस्ती कडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे रुग्नाची व नातेवाईकाची गैरसोय टाळण्या साठी व गंभिर रुग्नाचे प्राण वाचवण्या साठी तात्काळ या रस्त्याची दुरूस्ती करावी व पुर्ण रस्त्याचे सिंमेट रस्ता करावा आशी मागणी या भागातील सामाजीक कार्यकर्ते कैलास बोरगावकर यांनी केली आहे



# लाडकी बहीण योजनेनंतर आता विद्यार्थ्यांसाठी ही खास विद्यावेतन योजनेची घोषणा.



नाशिक/सुरेश इंगळे. आज पहाटे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सपत्नीक विठ्ठलाच्या शासकीय महापूजेला सुरुवात झाली आहे. यावेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन ,आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्यासह अनेक मंत्री ,खासदार देखील या महापूजेसाठी उपस्थित आहेत. मुख्यमंत्र्यांसोबत यंदा नाशिक जिल्ह्यातील बाळू शंकर अहिरे (वय ५५) ,आशा बाळू अहिरे (वय ५०)या वारकरी दाम्पत्याला शासकीय महापूजेसाठी उपस्थित राहण्याचा मान मिळाला आहे. अहिरे हे नाशिक जिल्ह्यातील अंबासन गावचे रहिवासी असून ते मागील सोळा वर्षापासून नियमित पंढरीची वारी करत आहेत . तत्पूर्वी मुख्यमंत्री त्यांनी पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने आयोजित केलेल्या "कर्मयोगी सुधाकर पंत परिचारक कृषी पंढरी महोत्सवाचे" उद्घाटन केलं .या कार्यक्रमामध्ये बोलताना शिंदे यांनी शासकीय महापूजेचे औचित्य साधून विद्यावेतन देण्याची घोषणा केली . मुख्यमंत्री म्हणाले राज्यात शेतकऱ्याचं ,कष्टकराचं ,वार कराचं, कामगाराचं ,सरकार आहे .हे सरकार सर्वांचं भलं कसं होईल हे पाहते . आपल्या सरकारने महिलांसाठी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आणली या योजनेअंतर्गत राज्यातील महिलांना दर महिन्याला पंधराशे रुपये म्हणजे वर्षाला १८ हजार रुपये दिले , जातील तसेच त्यांना दरवर्षी तीन गॅस सिलेंडर दिले जातील या योजनेचे पैसे लवकरच महिलांच्या खात्यात वळवले जातील. या योजनेनंतर मुख्यमंत्र्यांनी विद्यार्थ्यांसाठीही खास विद्यावेतन योजनेची घोषणा केली आहे. या योजनेअंतर्गत आपल्या राज्यातील तरुण ज्या कारखान्यात काम करतील (अप्रेंटीशीप) करतील तिथे त्यांच्यासाठी आपलं सरकार पैसे भरणार आहे .इतिहासात पहिल्यांदाच एखाद्या सरकारने अशा प्रकारची योजना आणली आहे .या योजनेद्वारे बेरोजगारीवर आपण उपाय शोधून काढला आहे . या योजनेअंतर्गत आपले तरुण कारखान्यात काम करतील आणि त्यांना सरकार स्टायपंड देईल. दरम्यान आषाढी एकादशी यात्रेच्या सोहळ्यासाठी आज १५ लाखाहुन अधिक भाविक पंढरपुरात दाखल झाले आहेत. पंढरी नगरी विठू नामाच्या जयघोषाने दुमदुमली आहे चंद्रभागे कडे जाणारे सर्व रस्ते गर्दीने फुलून गेले आहेत.

# धारूर येथे ज्ञानदीप विद्यालय आयोजित संत वारकरी दिंडी संपन्न.

**किल्ले धारूर/प्रतिनिधी**
धारूर शहरातील ज्ञानदीप प्राथमिक विद्यालय व बालसंस्कार केंद्र आयोजित आषाढी एकादशी निमित्त संत वारकरी दिंडी संपन्न झाली.

यावेळी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी विठ्ठल रुक्मिणी तसेच संत ज्ञानेश्वर ,संत तुकाराम, संत नामदेव ,संत मुक्ताबाई ,संत जनाबाई आधी संतांच्या वेशभूषा



करून सर्वांना आकर्षित केले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये मान्यवरांच्या हस्ते विठ्ठल रुक्मिणी च्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये मान्यवर व वारकऱ्यांच्या उपस्थितीमध्ये विद्यार्थ्यांनी हरी नामाच्या गजरात फुगडी व पहिले रिंगण पार पडले . व पालखी शहरामध्ये मार्गस्थ झाली.पुढे हनुमान चौकामध्ये बाल चिमुकल्यांच्या दिंडीचे दुसरे रिंगण पार पडले.शेवटी बाल चिमुकल्यांचा वारकरी सोहळा आनंदात व उत्साहात साजरा करण्यात आला.

# छोट्यांची मोठी दिंडी,गांवदरा शाळेतील चिमुकल्या वारक-यांनी गावात केले भक्तीमय वातावरण.

**किल्लेधारूर/प्रतिनिधी**
धारूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक गावंदरा शाळेत बालगोपाळांचा दिंडी सोहळा, यामुळे संबंध गावात भक्तीमे वातावरण निर्माण झाले होते. श्री विठ्ठुरायाचे जयजकारण सर्व परीसर दणाणुण गेला होता.

विठ्ठल रुक्मिणी च्या वेशभूषेत आणि वारकऱ्यांच्या टाळ गजरात शाळेपासून गावाबाहेरील महादेवाच्या मंदिरापर्यंत दिंडी काढण्यात आली. "विठ्ठल ,विठ्ठल ,विठ्ठला



,हरी -ओम विठ्ठला ,"तसेच "राम -कृष्ण - हरी जय ,जय राम- कृष्ण- हरी "या नामघोषाने परिसर दुमदुमून गेला होता. महादेवाच्या मंदिरात चिमुकल्या वारकऱ्यांनी टाळ वीणा यांच्यासह भक्तिमय अभंग गवळणी सादर केल्या त्यांच्या सोबतच गावातील शिक्षण प्रेमी माता - पालक ,पत्रकार यांनी ही दिंडीचा आनंद घेतला. माता-पालकांनी फुगड्या खेळून तसेच सर्व चिमुकल्या वारकऱ्यांनी फुगड्या चा आनंद घेतला. अभंगाच्या तालावर पाऊले खेळले , जणू ,"पंढरपूर येथे अवतरले" .नयनरम्य असा देखावा पाहायला मिळाला . या उपक्रमामुळे भारतीय संस्कृती व परंपरा यांचे संस्कार बालमनावर झाल्याशिवाय राहणार नाहीत. या साक्षरतेच्या वारीतून बालविवाह प्रतिबंध, नवसाक्षर भारत, शिक्षणाचे सार्वत्रिकरण, पर्यावरणाची जोपासना करणारे संदेश देण्यात आले. या दिंडीसोहळ्याचे सर्व ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे. सर्व चिमुकल्या वारकऱ्यांना गोड खाऊचे वाटप करण्यात आले .या सोहळ्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक . दत्ता घोळवे, व्यवस्थापन समिती अध्यक्ष अरुण बडे तसेच, विजयकुमार सिताप , बाबासाहेब चौधरी , रामेश्वर मुंडे, विशाल कदम, श्रीम. मीरा फरताडे, श्रीम.अनुराधा मोतेवार , श्रीम. जया घुगे-मुंडे यांचे सहकार्य लाभले.

# आयएएस पूजा खेडकरांचे पुण्याच्या जिल्हाधिकाऱ्यां विरोधात खळबळजनक आरोप !



## प्रकरणाला वेगळे वळण ?

### महाराष्ट्रातलं प्रशिक्षण स्थगित

**पूजा खेडकर यांचा महाराष्ट्रातील जिल्हा प्रशिक्षण कार्यक्रम स्थगित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. लाल बहादूर शास्त्रीय प्रशासकीय अकादमी यांनी दिलेल्या निर्देशानुसार महाराष्ट्र शासनाने ही कारवाई केलीय. २३ जुलै पूर्वी मसूरी इथल्या अकॅडमीमध्ये पुन्हा हजर राहण्याचे पूजा खेडकर यांना आदेश देण्यात आले आहे.**

### तक्रार पुणे पोलिसांकडे वर्ग

वाशिम पोलिसांकडे करण्यात आलेली तक्रार ही पुणे पोलिसांकडे वर्ग करण्यात आली आहे. पूजा खेडकर यांनी पुणे जिल्हाधिकारी यांच्या विरोधात छळवणुकीची तक्रार दाखल केली होती. काल रात्री वाशिम पोलिसांकडे ही तक्रार दाखल करण्यात आली होती. ही तक्रार वाशिम पोलिसांनी पुणे पोलिसांकडे वर्ग केली आहे. तक्रारीच्या कायदेशीर गोष्टीबाबत विचार सुरु वाशिम पोलिसांकडून पूजा खेडकर यांचा जबाब नोंदवून घेण्यात आला आहे.

**वादळवार्ता/मुंबई**
ट्रेनी आयएएस पूजा खेडकर या आपल्या खासगी गाडीवरील अंबर दिव्यामुळे तसेच महाराष्ट्र शासनच्या पाटीमुळे चर्चेत आल्या. यानंतर खोटे दिव्यांगप्रमाणपत्र, नॉन क्रिमिलियर सर्टिफिकेट जोडल्याचा आरोप त्यांच्यावर झाला. यानंतर त्यांची आई मनोरमा खेडकर यांच्यासंबंधी 2 व्हिडीओ व्हायरल झाले. या सर्वामुळे खेडकर कुटुंबाच्या अडचणी दिवसेंदिवस वाढत चाललेल्या दिसत आहेत. दरम्यान आयएएस पूजा खेडकरांनी पुण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांविरोधात आरोप केले आहेत. पूजा खेडकर यांनीही पुण्याच्या जिल्हाधिका-यां विरोधात तक्रार केल्याची माहिती सूत्रांनी दिलीय. पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी आपला मानसिक छळ केल्याचा आरोप पूजा खेडकरांनी केल्याचं सूत्रांचं म्हणणं आहे.. यासंदर्भात वाशिम पोलिसांनी पूजा खेडकरांचा जबाब नोंदवल्याचीही माहिती मिळतेय.. ३ महिला अधिका-यांनी पूजा खेडकर यांच्याशी तब्बल ३ तास चर्चा केली.. पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसेंच्या तक्रारीनंतरच पूजा खेडकर यांची प्रशिक्षणासाठी वाशिममध्ये बदली करण्यात आली होती. दिवसेंच्या तक्रारीनंतरच पूजा खेडकरांचं संपूर्ण प्रकरण उजेडात आलं होतं. केंद्राला पाठवणार अहवाल पूजा खेडकरचे निवेदन आणि जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे अहवाल गुरुवारपर्यंत सामान्य प्रशासन विभागाला पाठण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. राज्य सरकारचे विभागीय आयुक्तांना आदेश अहवाल इंग्रजीत भाषांतर करून पाठवण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. यासदंर्भात विभागीय आयुक्त चंद्रकांत पुंडलुकवार गुरुवारपर्यंत अहवाल सादर करणार आहेत.राज्य सरकारच्या पूजा खेडकर कारवाईनंतर सामान्य प्रशासन विभाग केंद्राने नेमलेल्या समितीला अहवाल देणार आहे. चुकीच्या कागदपत्रांच्या माध्यमातून निवड? आयएएस पदापर्यंत पोहोचण्यासाठी पूजा खेडकर यांनी चुकीची कागदपत्रे सादर केल्याचा आरोप आहे. चुकीच्या कागदपत्रांच्या माध्यमातून पूजा यांची निवड झाली का? असा प्रश्न उपस्थित होतोय.या पार्श्वभूमवर पंतप्रधान कार्यालयातून यासंदर्भातील माहिती मागवण्यात आली आहे.



आषाढी एकादशी निमित्त बाभळवाडी येथे फराळ वाटप... आज आषाढी एकादशी निमित्त शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी पांडुरंगाचे मनोभावे दर्शन घेऊन श्री.जगदंबा पेट्रोलियम बीड पिंपळनेर रोड, बाभळवाडी फाटा येथे पिंपळनेर परिसरातील भाविक भक्तांना साबुदाणा खिचडी व केळी वाटप केली. यावेळी गावातील सर्व वरिष्ठ व तरूण सहकारी मित्र उपस्थित होते..!!

# ज्ञानराधाच्या ठेवीदारांनी घेतली भाजपला मतदान न करण्याची शपथ.

**बीड/प्रतिनिधी**
बीड शहरातील सुरेश कुटेनी सुरु केलेल्या ज्ञानराधा मल्टीस्टेट मध्ये लाखो नागरिकांनी, शेतकऱ्यांनी, डॉक्टर, व्यापाऱ्यांनी यात पैसा गुंतवला, ठेवी ठेवल्या होत्या. ठेवीदारांना वेळेवर व अडचणीच्या काळात पैसा न मिळाल्याने काही ठेवेदारांनी सुरेश कुटे, अर्चना कुटे, आशिष पटोदकर सह संचालक मंडळावर विविध पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल केले आहे. सुरेश कुटे सध्या पोलिसांच्या ताब्यात असून त्यांची चौकशी चालू आहे. सुरेश कुटे यांनी वेळोवेळी सोशल मीडियाच्या माध्यमातून ठेवीदारांना भावनिक करत, माझ्या आई-वडिलांच्या नावाने ज्ञानराधा मल्टीस्टेट आहे त्यामुळे मी कोणाला फसवणार नाही मी सर्वांचे पैसे देणार, माझा फंड विदेशातून येणार आहे असे खोटे आश्वासन दिले जात होते. त्यातच कुटे नी होणाऱ्या कारवाया, अटक थांबवण्यासाठी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. त्यामुळे ठेवीदार, शेतकरी, व्यापारी वर्ग, डॉक्टर चांगले संतापले असून जालना जिल्ह्यातील अंबड येथे उपोषण सुरू असताना त्यांची दखल कोणीच न घेतल्याने ठेवीदारांनी संतापून कुटे ना प्रवेश दिलेल्या भाजप नाराजी व्यक्त करत भाजप पक्षाला मतदान करणार नाही अशी सामुहिक शपथ घेतली. त्यामुळे येत्या काळात विधानसभा तसेच विवध निवडणूकित ज्ञानराधाच्या ठेवीदाराच्या रोषाचा सामना करावा लागणार आहे.

# संस्कृती विधालयात आषाढी एकादशी पारंपारिक व धार्मिक पद्धतीने उत्साहात साजरी



**बीड/प्रतिनिधी**
शिक्षणाचे तीर्थक्षेत्र संस्कृती विद्यालय शालेय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना संस्कार तसेच आपली संस्कृती आणि परंपरा याबाबतही जागृत करते . आज संस्थापक अध्यक्ष डॉ . दत्ता नलावडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे नियोजन खेडकर मॅडम यांनी केले होते . अत्यंत सुरेख पद्धतीने सुरुवातीला दिंडी काढण्यात आली . त्यानंतर गोल रिंगण तसेच फुगडी ,पावली असे दिंडीतील उपक्रम घेण्यात आले . सर्व वातावरण भक्तीमय झाले होते . ज्ञानोबा तुकाराम ,पंढरीनाथ महाराज की जय याचा जयजयकार चालू होता . श्री .राम हळनर सर यांनी आषाढी एकादशी बद्दल माहिती मुलांना दिली . आपण आषाढी एकादशी का साजरी करतो आणि याचं धार्मिक महत्त्व काय या विषयावर डॉ . दत्ता नलावडे सरांनी मुलांना मार्गदर्शन केले . एकूणच आजचा आषाढी एकादशीचा कार्यक्रम खूप उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला .

# आषाढी एकादशी निमित्त जागृत देवस्थान श्री बजरंग बली वेताळ मंदिर येथे भाविकांची मांदियाळी

**परळी वैजनाथ/प्रतिनिधी**
आषाढी एकादशीनिमित्त तीर्थक्षेत्र परळी येथे आज बुधवार दिनांक १७ जुलै रोजी प्रभुवैद्यनाथाचे दर्शन घेऊन भावी नेरुगिरी पर्वतावरील श्री इंद्रेश्वर व जागृत देवस्थान श्री बजरंग बली वेताळ भगवानचे दर्शन घेण्यासाठी मोठी गर्दी करीत असल्याचे दिसून येत होते. दिवसभर भजन कीर्तन करीत भाविक मोठ्या संख्येने मेरुगिरी पर्वतावर जात असल्याचे दिसून येत होते.



आषाढी एकादशी निमित्ताने पाचवे ज्योतिर्लिंग प्रभू श्री वैद्यनाथाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी आज पहाटे पाच वाजल्यापासूनच गर्दी केली होती. परळी येथे बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे ज्योतिर्लिंग आहे शिवाय येथे बारा ज्योतिर्लिंगाचे मंदिरही आहे. श्री वैद्यनाथाचे दर्शन घेतल्यानंतर मेरुगिरी पर्वतावरील श्री इंद्रेश्वराचे दर्शन घेण्याची परंपरा आहे. श्री इंद्रेश्वराचे दर्शन घेण्या अगोदर भाविक भक्त वैजनाथ मंदिराच्या बाजूस असलेले बजरंग बली श्री वेताळ भगवान चे दर्शन घेण्याची परंपरा आहे. त्यामुळे श्री बजरंग बली वेताळ मंदिर येथे आज आषाढी एकादशीनिमित्त दिवसभर हजारो भाविकांची मांदियाळी दिसून येत होती. आज पावसाची उघड असल्याने पहाटे ५ वाजल्यापासूनच भाविकांनी मंदिर परिसरात गर्दी केली असल्याचे दिसून येत होते.

# प्रशासन व युवा ग्राम च्या तत्परतेने थांबला बाल विवाह बाल विवाह थांबविण्यासाठी सामाजिक संस्था व प्रशासन नेहमी जागरुकतेने काम करत आहेत

**केज/प्रतिनिधी**
आपली मुलगी पंधरा- सोळा वर्षांची झाली. की, पालक लग्नाची घाई करतात. पण, या मुलीचे वय झाले आहे की नाही. नेमके हेच पहायला विसरून जातात. यावर्षी एप्रिल व मे महिन्यात लग्न मुहूर्त नसल्याने या महिन्यात लग्न नाही झाले मात्र आत्ता लग्न तारखा सुरु झाल्या आहेत. लग्न तारखा सुरु होताच बाल विवाहाच्या तक्रारी येऊ लागल्या . आज मौजे वरपगाव येथे बाल विवाह होत असल्याची माहिती मिळताच वरपगाव गावाचे उपसरपंच – विलास सुबराव पवार, ग्रामसेवक सी एल चिंचकर, व युवा ग्राम टीम योग्य वेळी पोहचली. घटनास्थळी पोहचल्यानंतर या बाल विवाह बाबत माहिती सांगण्यास कोणी तयार होईना. शेवटी जमलेल्या पालकांचे समुपदेशन करून आयोजित असलेला बाल विवाह रद्द करायला सांगितला. व आई वडिलांकडून आम्ही बालिकेचा बाल विवाह करणार नसल्याचे शपथपत्र लिहून घेतले. बाल विवाह कायद्याची माहिती सांगितली. प्रशासन व युवा ग्राम टीम ने तत्परता दाखविल्यामुळे हा बाल विवाह टळला. आपल्या शेजारी कुठे जर



बालविवाह होत असेल तर १०९८ या हेल्पलाइन क्रमांकावर फोन करावा, संपर्क साधून माहिती द्यावी असे जाहीर आवाहन चाईल्ड लाईन टीम, बीड हे करीत आहेत. फोन करणाराचे नांव गुपित ठेवले जाईल. एच.पी.देशमुख (कार्यकारी सचिव युवा ग्राम विकास मंडळ केज) लग्न करताना नवरीचे पाहता जन्म पत्रिका, रक्तगट, रंग मग वय का पाहत नाहीत. नवरी मुलीचे हे सर्व गुण पाहत असताना तिचा रक्त गट कोणता किती गुण सूत्र जुळतात तिचा रंग कसा आहे. हे सगळ पाहत आहात मग तिचे वय का आपण पाहत नाहीत. या वायावारच मुलीचे शरीर:ची वाढ मानसीक वाढ ठरलेली असते. शिकण्या खेळण्याच्या वयात तिचे हात पिवळे करण्याची वेळ येते. अश्विनी जगताप प्रकल्प समन्वयक चाईल्ड लाईन,बीड

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077